मराठी पुस्तके

# महात्मा फुल्यांचा पत्रव्यवहार

## महात्मा जोतिबा फुले

**12/27/2013**

टंकन:  हर्षला रामाणे

मुद्रितशोधन : आशा दादुडे

# महात्मा फुल्यांचा पत्रव्यवहार

या विभागात जोतीरावांनी पुणे नगरपरिषदेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लंकेट यांना १८ जुलै १८८० रोजी लिहिलेले पत्र प्रथम छापलेले आहे. ते या आधीच्या आवृत्तीत परिशिष्ट सदराखाली छापलेले होते. त्यानंतर जोतीरावांनीं आपले व्याही हडपसरचे ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांना आपल्या सुनेच्या शिक्षणासंबंधी व तिच्या घरातील वागण्यासंबंधी लिहिलेली पाच खाजगी पत्रे छापलेली आहेत. ही पत्रे मुळात पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी लिहिलेल्या “महात्मा फुले यांचे चरित्र” या पुस्तकात छापलेली आढळली. का कोण जाणे “महात्मा फुले : समग्र वाङ:मय” या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या संपादकांनीं या पाच पत्रांचा समावेश केलेला नव्हता. ही त्रुटी दूर करण्यासाठी त्यांचा समावेश चौथ्या आवृत्तीत केलेला आहे.

# मद्यपानगृहांच्या वाढीस विरोध दर्शविणारे पत्र

“नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य संभाळण्याच्या उद्देशाने बराच मोठा नोकरवर्ग नेमला आहे. लोकांचे आरोग्य संभाळण्याचे दृष्टीने तसे एक खातेसुद्धा ती चालवीत आहे. तथापि ज्या पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते, त्यात आत भरवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अध:पाताची सर्व बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे, हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे, त्याला बाध येत आहे.

“दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे; एवढेच नव्हे, तर त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे, हे माझे म्हणणे बहुतेक लोक आपखुषीने मान्य करतील. दारूचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे की, त्यामुळे अनेक कुटुबांचा संपूर्ण नाश झाला आहे. आणि ह्या दुर्गुणाला आत शहरात सराईतपणा आला आहे.

“ह्या व्यसनाच्या प्रसाराला काही प्रमाणात तरी आळा बसावा म्हणून मी नगरपालिकेला अशी सूचना करतो की, नगरपालिकेने या दारूगुत्यांवर, ते ज्या प्रमाणात हानी करतात, त्या प्रमाणात कर बसवाव. मला असे कळले की, कुठल्याही नगरपालिकेने अशा गुत्यांवर कर बसविलेला नाही. मात्र त्यांच्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो. या बाबतीत आवश्यक तर नगरपालिकेने चौकशी करावी. माझा हा ठराव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आपला आभारी होईन.”

---

[धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले, मुंबई, १९६८, पृ. १८५-१८६.]

**----समाप्त----**

## ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांस पत्रे-

**पत्र १ लें** ॥ सत्यमेव जयते ॥ तारीख १३-९-१८८८

**रा.रा. ग्यानोबा कृष्णाजी ससाणे** यांस–

वि. वि. एक धर्मपुस्तक व व्याकरण एवढीं दोन पुस्तकें मात्र ठेऊन घेतलीं. बाकीचीं सर्व पुस्तकें व स्लेट परत पाठवून दिली. यांचा काहीं उपयोग नाहीं. सरकारी शाळेत चि. लक्ष्मी चौथ्या इयत्तेत पसार झाली. व त्या इयत्तेकरितां लागणारी सर्व पुस्तकें येथें खरेदी केलीं. मुलीच्या जन्माची तारीख कृपा करून इकडे पाठवून द्या, कारण सरकारी शाळेंतील पंतोजीस तिचे कारण आहे.

ताजा कलम:–सध्या मुलीचा अभ्यास बरा चालला आहे. परंतु तिकडून आलेल्या लोकांस पाहिल्याबरोबर तिच्या अभ्यासाचा थोडा खोळंबा होतो. यास्तव तिला चांगले लिहिण्याचा नाद लागतो पावेतो, तिकडून (हडपसराहून) अज्ञानी वायफळ माणसे जर पाठविणार नाही तर तुमची मोठी मेहेरबानी होईल. आदि सत्यमहाराज.

तात्यासाहेबाकरितां गो. ग. काळे,<br>
स. शो. स. कारकून.

**पत्र २ रें** ॥ सत्यमेव जयते ॥ ता. २४ माहे सप्टेंबर सन १८८८

**चि. सत्यरूप ग्यानोबा कृष्णाजी ससाणे** यांस–

अनेक आशिर्वाद......सौभाग्यवतीनें एकदाचें सर्व काम सांभाळून लक्ष्मीस अगदी मोकळी ठेवली आहे. त्यामुळे तिचा अभ्यास सुरळीत होईल अशी चिन्हे दिसतात. यास्तव मी निर्मीकाचें आभार मानतो. कळावे. आदि सत्यमहाराज.

आपला,<br>
**जोतीराव गोविंदराव फुले.**

**पत्र ३ रें** ॥ सत्यमेव जयते ॥

**चि. सत्यमूर्ती ग्यानोबा कृष्णाजी ससाणे,** हडपसर.

अनेक आशीर्वाद ता. ३० सप्टेंबर रोजी चि. काशीबाई उर्फ लक्ष्मीबाई ह्या पुन्यास आमचे घरी मुलीस पाहण्यास आल्या होत्या. तें समई त्यांनीं चि. राधा उर्फ लक्ष्मीबाईची चांगली कानउघाडणी केली; त्यामुळें आम्हां सर्वांस फार संतोष झाला. लक्ष्मीबाईस आम्ही परत हडपसरास दुसरें दिवशी पाठवावें बरें, परंतु सौभाग्यवतीनें तिजला आग्रह करून राहती केली; म्हणून आम्हां सर्वांस क्षमा असावी कळावे. आदि सत्यमहाराज.

ता. २ माहे ऑक्टोबर १८८८ आपला,

**जो.गो.फुले.वि.गो.ग.का. कारकून**

**पत्र ४ थें** ॥ सत्यमेव जयते ॥ ता. १८ माहे आक्टोबर १८८८ इ.

**चि.ग्यानोबा कृष्णाजी ससाणे**, मुक्काम हडपसर.

अनेक आशिर्वाद. आपल्या उभयतांच्या अनुमतीनें असें ठरलें होतें कीं, चि. लक्ष्मीबाईस हायस्कूलांत पाठवावी. हल्लीं ज्या शाळेंत चि. लक्ष्मीबाई आहे त्या शाळेत पाठविण्याची सोय नाहीं, असे माझ्या मतें ठरतें. आतां मुलीस हायस्कूलांत जर पाठवावी, तर दिपवाळी समीप येऊन ठेपली आहे. मुलगी जर यावेळी हायस्कूलांत पाठवावी, तर चि. काशीबाईस मुलीशिवाय सणामध्ये घास धकणार नाही. यास्तव चि. लक्ष्मीबाईस तुमचे घरी चि. सादुजी गंगाजी वाघुलू यांजबरोबर तोळे, वाळे आणि गोठासहित दिपवाळी करण्याकरितां पाठवून देतो....... चि. काशीबाईस मुलीच्या शिक्षणाविषयी जर आनंद वाटत नाही तर आम्हास त्याविषयी फार दु:ख वाटते. मर्जी देवाची..... आदि सत्यमहाराज.

**तात्यासाहेबांच्या** सांगण्यावरून,
गो.ग.काळे, स.शो. समाजाचे कारकून.

**पत्र ५ वें** ॥ सत्यमेव जयते ॥ ता. २१ डिसेंबर सन १८८८ इ.

चि. ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, मुक्काम हडपसर.

अनेक आशिर्वाद......आपल्या दीन अज्ञानी बांधवांकरिता एक "सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक" तयार करण्याचें कामीं गुंतलो होतो, यास्तव मला आपणास एकहि पत्र लिहिण्यास फुरसत झाली नाहीं. असो; सुनबाई बुद्धीनें स्मरणानें फार उत्तम असून मोठी मायाळू आहे. म्हणून इच्यामध्यें जे गुण आहेत त्यांची वरदास्त ठेविल्यानें परिणाम फार चांगला होणार आहे......आपली आजी कै. राहीबाई म्हणजे माझी मावशी इचा स्वभाव आपल्यांतील वडील धाकट्यास "जी" म्हणण्याचा परिपाठ होता. तिची आठवण होताच मनास उल्हास होतो. आणि तुमच्या ससाण्यांच्या घराण्याचें मोठे वैभव वाटत होतें. परंतु चि. सुनबाई येथे आल्यापासोन हा काळपावेतो तिनें सर्वांस "जी" म्हणण्याकरितां किती वेळां सामोपचारानें व गोडीगुलाबीने सांगून तिला कित्येक वेळां जरी खाऊ दिले, तरी तिला आशीच "जी" वाचण्याची लाज वाटते......तिने आजपावेतों केलेल्या अभ्यासाविषयी आपण स्वत: तिची झडती घेऊन तिला काही वेळ खळण्यास मोकळीक देत जाल तर बरें होईल.

ताजा कलम–काल सकाळीं माझी प्रकृती बिघडली होती. त्यावेळीं चि. सुनबाईनें मोठे पोलाईनें कुंडाल्यासारखें मला शेकले; आणि मोठ्या भक्तीनें मी नीट होईतोपर्यंत बसली; आणि....घरांतील समया घासून काढल्या.

आपला
**जोतीराव फुले.**

**—समाप्त—**